सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १३७ | शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





प्रा. श्री. हिरालाल पाटील
पत्रकार



श्री. जेठमल जैन
अध्यक्ष : व्यापारी महासंघ, अमळनेर

## दिनविशेष
०७ फेब्रुवारी

- गंगाधर नरहर पाठक यांनी पुण्यातील आर्यन येथे पहिला चित्रपटगृह सुरू केला. तेथे प्रदर्शित होणारा पहिला मूकपट हिरयाची अंती होता.
- अंतराळ शटल कार्यक्रमः अंतराळ शटल अटलांटिस हे मिशन STS-98 वर प्रक्षेपित करण्यात आले, जे डेस्टिनी प्रयोगशाळा मॉड्यूल आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात घेऊन गेले.
- क्रिकेट प्रशिक्षक रमाकांत आचरेकर यांना श्री शिव छत्रपती जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

### दै. ग्लोबल महातेजच्या बातमीचा पुन्हा दणका!

# पालिकेच्या व्यापारी संकुलाची युद्धपातळीवर स्वच्छता...!!

## व्यापाऱ्यांसह ग्राहक, नागरिकांना मिळाला दिलासा



# व्यापारी संकुल घाणीच्या विळख्यात!

## अवैध कृत्यांचाही बनला अड्डा; पालिकेचे दूर्लक्ष

नागरिकांमध्ये संताप

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून पालिकेच्या इमारतीजवळील उभारलेले टी.पी. नंबर ६०/१ बी.ओ.टी. व्यापारी संकुल सध्या पूर्णतः दुर्लक्षित आहे. परिसरात घाणीचे साम्राज्य आहे. अवैध कृत्यांचे केंद्र बनले आहे. सार्वजनिक निधीतून उभारलेली ही भव्य इमारत अक्षरशः वायाच गेली असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे. गेल्या काही वर्षांपूर्वी पालिकेच्या निधीतून हे व्यापारी संकुल बांधण्यात आली होती. त्यानंतर काही दुकानांचा निलावही करण्यात आला. मात्र, सद्यस्थितीत अनेक दुकाने दुर्गंधी आणि घाणीमुळे रिकामी पडली आहेत. देखभाली अभावी संपूर्ण इमारतीची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या व्यापारी संकुलातील प्रत्येक गाळा दारूच्या बाटल्या, पोटल्या, कचरा तसेच शौच-लघूशंकेने माखलेला आहे. पहिल्या मजल्यापासून थेट छतापर्यंत घाणीचे साम्राज्य आहे. मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. इमारतींचा वापर शौचासाठी होत आहे. परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

अमळनेर : पालिका कार्यालयाच्या इमारतीजवळील व्यापारी संकुल. दुसऱ्या छायाचित्रात व्यापारी संकुलाच्या प्रवेशद्वारावर असलेली घाण. तिसऱ्या छायाचित्रात व्यापारी संकुलातील जिन्याजवळील दयनीय अवस्था. शेवटच्या छायाचित्रात वरच्या मजल्याची दुरवस्था. (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

रात्रीच्या वेळी या ठिकाणी गावगुंडांचा वावर वाढलेला आहे. गांजा, दारू, गुटखा यांसारख्या व्यसनांचे सेवन, तसेच महिलांना घेऊन अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या चर्चा नागरिकांकडून होत आहेत. संपूर्ण इमारत खुली असल्याने दोन्ही बाजूने वर जाण्यासाठी जिन्याने अवैध कृत्ये सुरू आहेत. काळी गाळ्यांचे शटरही तोडलेले दिसून येत आहेत. सामान्य नागरिकांकडून कर, पाणीपट्टी व विविध शुल्क वसूल केले जातात. मात्र, कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेची अशी अवस्था होणे ही गंभीर बाब आहे. जनतेच्या पैशातून उभारलेली ही इमारतीची पालिकेच्या निष्काळजीपणामुळे नासधूस होत असल्याचे दिसून येत आहे.


"संबंधित व्यापारी संकुलाबाबत अद्याप पूर्ण माहिती नाही. याबाबत सविस्तर माहिती घेण्यात येईल. पालिकेच्या मीटिंगमध्ये हा विषय मांडून या समस्येचे निराकरण करण्यात येईल. नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची आम्ही काळजी घेत आहोत. शहरात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. सर्व समस्यांचे निराकरण करण्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : येथील पालिका कार्यालयाच्या इमारतीच्या मागेच बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या व्यापारी संकुल घाणीच्या विळख्यात होते. याबाबत दै. ग्लोबल महातेजने गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी 'व्यापारी संकुल घाणीच्या विळख्यात!, अवैध कृत्यांचाही बनला अड्डा; पालिकेचे दूर्लक्ष' या ठळक शिर्षक, उपशिर्षकासह बातमी प्रकाशित केली होती. या समस्येस वाचा फोडल्याने पालिकेने याची दखल घेतली आहे. शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी पालिकेकडून या व्यापारी संकुलाच्या स्वच्छतेस वेग आला आहे. लवकरच हे व्यापारी संकुल चकाचक होणार आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांसह ग्राहक व नागरिकांना दिलासा मिळणार आहे.**

येथील पालिकेने कोट्यवधी रुपये खर्चून पालिकेच्या कार्यालयाच्या इमारतीजवळ टी.पी. नंब ६०/१ हे व्यापारी संकुल बीओटी तत्वावर बांधले आहे. मात्र, या व्यापारी संकुलाची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती. अनेक दुकाने ही स्वच्छतेअभावी रिकामी होती. व्यापारी संकुलात घाणीचे साम्राज्य होते. कचरा, प्लास्टिक बाटल्यांचा खच पडला होता. या व्यापारी संकुलाचा लघुशंका व शौचासाठी वापर सुरू होता. दुर्गंधीने सारेच हैराण झाले होते. अवैध धंदेही बोकाळले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत होता.

या समस्येला दै. ग्लोबल महातेजने वाचा फोडल्याने पालिकेकडून आता स्वच्छता मोहीम सुरू झाली आहे. पाच कर्मचारी युद्धपातळीवर स्वच्छतेचे काम करत आहेत. लवकरच संपूर्ण व्यापारी संकुल हे चकाचक होणार असल्याने ग्राहक, व्यापारी व नागरिकांमधून दै. ग्लोबल महातेजच्या वृत्ताचे कौतुक होत आहे.



अमळनेर : घाणीच्या विळख्यात असलेल्या पालिकेच्या व्यापारी संकुलाची युद्धपातळीवर स्वच्छता करताना कर्मचारी.
(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)



अमळनेर : 'आययूडीपी' व्यापारी संकुलात साचलेला कचरा.

# 'आययूडीपी' व्यापारी संकुलातील स्वच्छतागृहाची दयनीय अवस्था

## व्यापाऱ्यांसह ग्राहक, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अर्बन बँकेसमोरील पालिकेच्या आययूडीपी व्यापारी संकुलातील स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था झाली आहे. विशेष म्हणजे या संकुलाच्या अग्रस्थानी साने गुरुजींचा पुतळा आहे. सर्वत्र घाणच घाण पसरलेली आहे. विशेष म्हणजे काही अंतरावरच पालिकेचे कार्यालयही आहे. मात्र, याकडे पालिकेचे दूर्लक्ष आहे. व्यापारी, ग्राहक व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे.

स्वच्छतागृहाच्या बाहेरील परिसरात कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. प्लास्टिक, कचरा, साचलेल्या पिशव्या यामुळे सर्व परिसर विद्रूप बनला आहे. याचा मोठ्या प्रमाणात त्रास सर्वांना सहन करावा लागत आहे. स्वच्छतागृहाच्या आतील भागातील परिस्थितीही गंभीर आहे. पाणी, शेवाळ, काळवंडलेल्या भिंती, तोडफोड आणि स्वच्छतेचा अभाव आहे. नियमित पाणीपुरवठा, निर्जंतुकीकरण व साफसफाई होत नसल्याचे दिसून येते.

साने गुरुजींसारख्या महापुरूषांच्या पुतळा परिसरातच अस्वच्छता असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. स्वच्छ शहरच्या घोषणा फलकांचा बोजवारा उडाला आहे. पालिका प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन परिसराची स्वच्छता करावी. कचरा हटवून नियमित साफसफाईची व्यवस्था करावी. तसेच स्वच्छतागृहांची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

# अवैध वाळू वाहतूकप्रकरणी जळोद येथून ट्रॅक्टर जप्त

## महसूल विभागाची कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तहसील आवारात लावण्यात आलेले ट्रॅक्टर.

अमळनेर : तालुक्यातील जळोद परिसरात एक ट्रॅक्टर वाळूची अवैध वाहतूक करताना आढळून आले. याप्रकरणी महसूल प्रशासनाने शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी कारवाई करून ते ट्रॅक्टर जप्त करून तहसील आवारात लावण्यात आले आहे. पकडण्यात आलेल्या ट्रॅक्टरचा मालक मुन्ना ईश्वर कोळी (रा. जळोद) असल्याची माहिती महसूल विभागाकडून देण्यात आली. तालुक्यातील दहिवद येथील ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबत महसूलने कडक भूमिका घेतली आहे. अशा कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे महसूलकडून सांगण्यात आले.

# तीन दिवस निरभ्र आकाश राहण्याचा अंदाज

**अमळनेर :** जिल्ह्यात पुढील तीन दिवसात हवामान पूर्णपणे स्वच्छ आणि निरभ्र राहण्याची शक्यता आहे. हिवाळा निरोप घेण्याच्या तयारीत असताना आता थंडी आणि उन्हाळा अशा दोन्ही ऋतूंचा संगम जळगावकरांना अनुभवता येणार आहे. दिवसा सूर्याच्या तेजस्वी प्रकाशामुळे उन्हाचा चटका जाणवेल, तर रात्री १० वाजेनंतर पहाटेपर्यंत मध्यम स्वरूपाची थंडी कायम राहणार आहे. पुढील काही दिवसांत जिल्ह्याचे किमान तापमान १३ ते १५ तर कमाल तापमान ३२ ते ३४ अंश दरम्यान राहील.

# अमळनेर तालुका फ्रूटसेल सोसायटीच्या १३ जागांसाठी ८ मार्चला मतदान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुका फ्रूटसेल सोसायटीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. ४ फेब्रुवारीपासून अर्जांची विक्री व दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ८ मार्च रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

उमेदवारांना मंगळवार, दि. १० फेब्रुवारीपर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अमळनेर यांचे कार्यालयात उमेदवारी अर्ज खरेदी व दाखल करता येणार आहेत. दरम्यान एकूण १३ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. यात सर्वसाधारण ८, अनु जाती-जमाती १, वि.जा.भ.ज.व विमाप्र १, इ.मा.व. १, महिला २ अशा एकूण १३ जागांचा समावेश आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्र दररोज दुपारी ३. ३० वाजता प्रसिद्ध करण्यात येतील. नामनिर्देशन पत्राची छाननी ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता निवडणूक कार्यालयात होईल.

तर विधिग्राह्य नामनिर्देशन पत्रांची सूची १२ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता निवडणूक कार्यालयात प्रसिद्ध होईल. नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची मुदत १२ ते २६ फेब्रुवारीपर्यंत आहे. या मुदतीत सकाळी ११. ३० ते दुपारी ३ या वेळेत निवडणूक कार्यालयात अर्ज मागे घेता येईल. पात्र उमेदवारांना २७ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता निवडणूक कार्यालयात चिन्ह वाटप होणार आहे. याचवेळी अंतिम विधिग्राह्य नामनिर्देशनांची यादी प्रसिद्ध होईल. यानंतर आवश्यक असेल तर ८ मार्च रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडेल. याचे स्थळ नंतर जाहीर केले जाईल. तर मतदान आटोपल्यावर याच दिवशी दुपारी ४. ३० वाजेनंतर मतमोजणी होऊन त्यानंतर निकाल घोषित केला जाईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी एस. पी. महाजन यांनी दिली. अधिक माहितीसाठी ९४०३३९०७३८ यावर संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# सलग दुसऱ्या दिवशीही सोन्या-चांदीच्या दरात घसरण!

## चांदीचा भाव 'किती' रुपयांनी घसरला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोन्या आणि चांदीच्या दरात सलग दुसऱ्या दिवशीही मोठी घसरण नोंदवण्यात आली आहे. शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी व्यवहार सुरू होताच मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज ऑफ इंडियावर चांदीच्या किमतीत तब्बल १५ हजार रुपये प्रति किलोची घसरण झाली. त्यामुळे चांदीचा दर घसरून २, २९, ८७२ रुपये प्रति किलोवर आला आहे. सोन्याच्याही दरात घट झाली असून एमसीएक्सवर सोन्याच्या किमतीत जवळपास ०. ८ टक्क्यांनी घसरण झाली आहे. १० ग्रॅम सोने सध्या सुमारे १, ५०, ६७५ रुपयांवर पोहचले आहे. काही दिवसांपूर्वीच सोने आणि चांदीने




विक्रमी उच्चांक गाठला होता. मात्र, त्या उच्च पातळीवरून आता दोन्ही मौल्यवान धातूंमध्ये मोठी पडझड झाल्याचे दिसून येत आहे. एप्रिल २०२६ एक्सपायरीचा गोल्ड फ्युचर्स करार आपल्या विक्रमी स्तरापेक्षा सुमारे २८ हजार रुपयांनी आधीच खाली आला आहे. त्याचप्रमाणे चांदीही आपल्या 'ऑल टाइम हाय'च्या तुलनेत दीड लाख रुपयांहून अधिक स्वस्त झाली आहे.

### भाव घसरण्यामागची कारणे

बाजारतज्ज्ञांच्या मते, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कमी होण्याची चिन्हे दिसू लागल्याने सोन्या-चांदीच्या किमती कमी झाल्या आहेत. दोन्ही देशांमध्ये अणुकरारासंदर्भात पुन्हा चर्चा सुरू झाल्यामुळे जागतिक बाजारातील अनिश्चिततेचे वातावरण काहीसे कमी झाले आहे. परिणामी, गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक मानल्या जाणाऱ्या सोन्या-चांदीऐवजी डॉलरकडे वळताना दिसत आहेत. डॉलर मजबूत झाल्यास सामान्यतः सोन्या-चांदीच्या किमतींवर दबाव येतो आणि सध्या हीच स्थिती बाजारात पाहायला मिळत आहे. मागील काही आठवड्यांत मौल्यवान धातूंमध्ये मोठी तेजी होती. आता ही तेजी ओसरत असून दर हळूहळू खाली येत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. काही बाजारतज्ज्ञांनी आगामी काळात किमतींमध्ये आणखी घसरण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. एकंदरीत सध्या सोन्या- चांदीच्या बाजारात मोठी अस्थिरता कायम आहे. उच्च दरात खरेदी केलेले गुंतवणूकदार संधी मिळताच नफा वसुलीकडे वळू शकतात. आगामी काही दिवसांत जागतिक घडामोडी आणि डॉलरमधील गुंतवणूक यावरच सोन्या-चांदीच्या किमतींची पुढील दिशा अवलंबून राहणार आहे.

### संपादकीय

## देहबुद्धीच्या विस्मरणासाठी नामस्मरण

मानवी जीवनाचा खरा प्रश्न हा बाह्य जगाशी संबंधित नसून, तो अंतर्मुखतेचा आहे. मी कोण आहे? हा प्रश्न जितका साधा वाटतो, तितकाच तो गहन आहे. या प्रश्नाचे उत्तर न मिळाल्यामुळेच मनुष्याची अधोगती होत जाते. अध्यात्म सांगते, की प्रत्येक प्राणिमात्रात परमेश्वराचा अंश आहे; परंतु हे जाणण्याची, समजून घेण्याची बुद्धी केवळ मनुष्यालाच लाभलेली आहे. दुर्दैव असे, की हाच मनुष्य त्या बुद्धीचा योग्य वापर न करता देहबुद्धीत अडकून पडतो. जीव मुळात परमेश्वरस्वरूप आहे. सुरूवातीला तो 'मी तो आहे' अशी अनुभूती बाळगतो. कालांतराने ही भावना 'मी त्याचा आहे' इथपर्यंत येते आणि अखेरीस 'माझा आणि त्याचा काही संबंध नाही' या टोकापर्यंत घसरते. या घसरणीचे प्रमुख कारण म्हणजे देहबुद्धी. देह म्हणजेच 'मी' अशी भावना दृढ होत गेल्याने खरा 'मी' कोण आहे याचा विसर पडतो. मात्र मनुष्य अजाणतेपणीसुद्धा सत्याची साक्ष देतो.

एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर 'आमचे स्नेही गेले' असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा प्रत्यक्षात देह गेला आहे हे माहीत असूनही आपण देहाला स्नेही मानत नाही; तर त्यातील चैतन्यालाच आपला मानतो. याचा अर्थ असा, की सत्याची जाणीव आत कुठेतरी टिकून आहे, पण ती स्वतःच्या बाबतीत जागृत राहत नाही. या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी उपाय एकच आहे ज्या मार्गाने अधोगती झाली, त्याच मार्गाने उलट प्रवास करणे. म्हणजेच देहबुद्धीपासून ईश्वरबुद्धीकडे वाटचाल करणे. प्रथम ही जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे, की 'मी देह नाही; हा देह परमेश्वराचा आहे.' या जाणिवेची परमावस्था म्हणजे 'मी तोच आहे' ही अनुभूती. ही जाणीव कशी निर्माण होईल? ज्याच्या विस्मरणामुळे ही अधोगती झाली, त्याचे स्मरण केल्यानेच. आणि स्मरणाचे सर्वांत प्रभावी साधन म्हणजे भगवंताचे नाव. नामस्मरणाचा ध्यास लागला की माणसाला स्वतःची खरी ओळख पटते. खरा परमार्थ हा अतिशय सोपा आहे; मात्र तो योग्य मार्गाने केला पाहिजे.

जशी गाठ सोडवताना योग्य दोरी ओढावी लागते, अन्यथा गुंता वाढतो, तसेच परमार्थातही आहे. 'मी कोण आहे?' हे समजले की 'परमात्मा कोण आहे?' हा प्रश्न उरत नाही. कारण दोघांचे स्वरूप एकच आहे. परमात्मा निर्गुण आहे; त्याला जाणण्यासाठी साधकालाही देहबुद्धी सोडून निर्गुण व्हावे लागते. कोणतीही गोष्ट जाणण्यासाठी त्या वस्तुरूप व्हावे लागतेही अध्यात्माची मूलभूत भूमिका आहे. म्हणूनच परमात्म्याला जाणण्यासाठी परमात्मरूप व्हावे लागते. यालाच 'शिवो भूत्वा शिवं यजेत' असे म्हटले आहे. अखेरीस एकच सत्य उरतेनामस्मरणाची खरी, खोल धुंदी लागल्याशिवाय 'मी'पण जात नाही. आणि जोपर्यंत हा 'मी' टिकून आहे, तोपर्यंत देहबुद्धी सुटत नाही. म्हणूनच देहबुद्धीच्या विस्मरणासाठी आणि आत्मओळखीच्या प्राप्तीसाठी नामस्मरण हाच खरा, सरळ आणि शाश्वत मार्ग आहे.

# फायनान्शियल फसवणुकीत ग्राहकांना २५ हजार रुपयांची नुकसान भरपाई

## 'आरबीआय'कडून नव्या नियमावलीची होणार घोषणा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डिजिटल युगात वाढत चाललेल्या सायबर फसवणुकीवर अंकुश ठेवण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने मोठे पाऊल उचलले आहे. बनावट किंवा अनधिकृत व्यवहारांमुळे नुकसान झालेल्या ग्राहकांना दिलासा देण्यासाठी २५ हजार रुपयांपर्यंत नुकसानभरपाई देण्याची नवी नियमावली लागू करण्याची घोषणा आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी केली.

देशभरातील लहान रकमेच्या फसवणूक व्यवहारांमुळे नुकसान झालेल्या ग्राहकांना दिलासा देण्यासाठी आणि डिजिटल पेमेंट्सवरील ग्राहकांचा विश्वास वाढविण्यासाठी रिझर्व्ह बँकेने २५ हजार रुपयांपर्यंत नुकसानभरपाई देण्याची नवीन यंत्रणा लागू करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. लवकरच त्याची नियमावली जाहीर केली जाणार आहे, असे आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी मौद्रीक धोरण समितीच्या बैठकीनंतर स्पष्ट केले.

गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले, की देशात डिजिटल व्यवहारांशी संबंधित फसवणुकीच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी आरबीआयने आधीच अनेक उपाय केले आहेत. आता याच पार्श्वभूमीवर, डिजिटल पेमेंट्स अधिक सुरक्षित करण्यासाठी नवीन उपाययोजनांवर चर्चा पत्र प्रसिद्ध केले जाणार आहे. डिजिटल पेमेंट्स अधिक सुरक्षित करण्यासाठी आरबीआय टप्प्याटप्प्याने क्रेडिट लिमिट्स लागू करणे तसेच ज्येष्ठ नागरिकांसारख्या विशिष्ट ग्राहक गटांसाठी अतिरिक्त अर्थेंटिकेशन (सुरक्षा) व्यवस्था वाढविण्यासारखे उपाय करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**याचा फायदा?**

- ग्राहकांना फसवणुकीत त्वरित आर्थिक दिलासा
- डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित
- ग्राहकांचा डिजिटल बँकिंगवर विश्वास वाढेल

# ग्रामीण भागातही आता 'एआय'तंत्रज्ञानाचे धडे

## पंचवीस संगणकीकृत व्हॅनमधून कौशल्य विकास अभियान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : एचएएल, आयसेट व तालुक्यातील मंगरूळ ग्रामपंचायत यांच्यातर्फे १८ ते ३५ वर्षीय युवकांना पाच दिवस मोफत 'एआय' व संगणक प्रशिक्षण देण्यात येत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची परिस्थिती सर्वसाधारण असल्याने ग्रामीण मुलांना संगणक अथवा 'एआय' तंत्रज्ञान शिकण्यासाठी सुविधा उपलब्ध होत नाही अथवा परवडत नाही. म्हणून एचएएल कंपनीने सीएसआर फंडातून मोफत प्रशिक्षण उपक्रम सुरू केला आहे. महाराष्ट्रातील हा पहिला प्रयोग असून शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या परवानगीने सरपंच समाधान पारधी यांच्या मागणीनुसार मंगरूळ येथे २५ संगणक असलेली विशेष व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली आहे. सोबत मार्गदर्शन करण्यासाठी तंत्रज्ञ उपलब्ध करून देण्यात आले आहे. दररोज ५० मुली प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, सरपंच समाधान पारधी, ग्रामविकास अधिकारी कैलास जाधव, विस्तार अधिकारी सुरेश कठळे, संजीव पाटील, योगेश पाटील, अरुण घोलप हजर होते. ग्रामीण विद्यार्थ्यांना मोफत संगणक व एआय तंत्रज्ञान अवगत होत असल्याने त्यांनी या उपक्रमाचा आनन्द व्यक्त केला आहे.



मंगरूळ (ता. अमळनेर) : संगणकीकृत व्हॅनमध्ये प्रशिक्षण घेताना विद्यार्थी– विद्यार्थिनी.



अमळनेर : स्वप्नील पाटील यांचा सत्कार करताना महेंद्र रामोशे व उपस्थित मान्यवर.

# खासगी प्राथमिक पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी स्वप्नील पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्हा खासगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेच्या येथील साने गुरुजी प्राथमिक विद्यामंदिर शाळेचे स्वप्नील वसंतराव पाटील यांची उपाध्यक्षपदी नुकतीच बिनविरोध निवड झाली. यावेळी भुसावळ शहरातील हिंदी सेवा मंडळ संचलित आर. एन. नेता हिंदी प्राथमिक विद्यामंदिर शाळेचे उपशिक्षक अमित विजय चौधरी यांची अध्यक्षपद निवड झाली आहे.

जळगाव येथे शनिवारी पतसंस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आर. आर. पाटील यांनी कामकाज पाहिले.

पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक प्रसन्ना बोरोले, सलीम तडवी, गोविंदा लोखंडे, आशिष पवार, संतोष मराठे, प्रशांत साखरे, सुनील पवार, रूपाली पाटील, गणेश लोडते, प्रफुल्ल सरोदे, वना महाजन, राकेश पाटील, धनंजय काकडे, अविनाश घुगे, महेंद्र रामोशे, मोहन पालवे उपस्थित होते.




अमळनेर : गोल्डन विंग्ज स्कूलच्या स्नेहसंमेलनात नृत्य सादर करताना चिमुकले.

# चिमुकल्यांच्या कलाविष्काराने श्रोते मंत्रमुग्ध

## 'गोल्डन विंग्ज स्कूल'चे स्नेहसंमेलन उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील गोल्डन विंग्ज स्कूलचे तिसरे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार, दि. ३१ जानेवारी रोजी नुकतेच उत्साहात झाले. चिमुकल्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराने श्रोते मंत्रमुग्ध झाले. हृदयरोगतज्ज्ञ डॉ. संदीप जोशी यांनी उद्घाटन केले. सीए अजय हिंदुजा व विपुल गारमेंट्सचे मालक राजेंद्र कुंदनानी प्रमुख अतिथी होते. शाळेतील ३ ते ५ वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. केवळ मनोरंजनच नव्हे, तर 'मोबाईल आणि सोशल मीडियाचे दुष्परिणाम' या विषयावर एका उत्कृष्ट नाटिकेद्वारे चिमुकल्यांनी जनजागृतीपर संदेश दिला. स्नेहसंमेलनात पालकांनीही सहभागी होऊन आपले कलागुण सादर केले. वर्षभरात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना व सहभागी पालकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रशस्तीपत्रके देऊन गौरविण्यात आले.

बालाजी फाउंडेशनचे अध्यक्ष सतीश बडगुजर, सदस्य दीपक वाच्छानी, हितांशी वाच्छानी, क्रांती बडगुजर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, पालक व शुभचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनीच विद्यार्थ्यांच्या या कौतुकास्पद सादरीकरणाचे मुक्तकंठाने कौतुक केले.

# जानवे आरोग्य केंद्र राज्यात अव्वल

## 'एनक्यूएएस' गुणवत्ता मूल्यमापनात राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आरोग्य विभागाच्या एनक्यूएएस अंतर्गत मूल्यमापनात तालुक्यातील जानवे प्राथमिक आरोग्य केंद्राने ८७.९८ गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. राष्ट्राच्या स्पर्धेसाठी पात्र ठरले आहे.

जानवे प्राथमिक केंद्राने उल्लेखनीय कामगिरी करून रुग्णांच्या सेवा, स्वच्छता, सुविधा यासह इतर अनेक बाबतीत निकष पूर्ण केले आहेत. विशेष समितीने राज्यातील ७१ आरोग्य केंद्राचे मूल्यमापन केले. जानवे प्राथमिक आरोग्य केंद्राने एनक्यूएएस पात्रता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. आरोग्य केंद्राचे बळकटीकरण व आश्वासित आरोग्य सेवा पुरवण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर यांनी लक्ष केंद्रित केले होते. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरीश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकिय अधिकारी डॉ. संजय रनाळकर, डॉ. रिया शिसोदे तसेच उपकेंद्राचे अधिकारी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. याचा परिपाक म्हणून हा बहुमान प्राप्त झाला आहे. येथील कर्मचारी प्रशिक्षित असून रेकॉर्ड अपडेट, प्रसूती दर चांगला आहे. उत्तम सेवा दिली जाते. जानवे केंद्राचा राज्यात प्रथम क्रमांक येताच सुभाष पाटील, मनोज पाटील, हिरालाल पाटील, कैलास पाटील, विठ्ठल सोनवणे, कृष्णा पाटील, शरद पाटील आदींसह समस्त ग्रामस्थांनी आनंदोत्सव मनविला. वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार केला.




जानवे (ता. अमळनेर) : आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ.

# मुस्लिम खाटीक समाजाचा सामूहिक विवाह सोहळा

## अमळनेर येथे वीस जोडप्यांचा विवाह; वेळ, खर्चाची मोठी बचत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मुस्लिम खाटीक पंच मंडळातर्फे गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी इज्तेमा नगर येथे सामुहिक विवाह सोहळा झाला. वीस जोडप्यांचा यावेळी विवाह झाला. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. वेळ आणि खर्चाचीही मोठी बचत झाल्याने खाटीक समाजाने आदर्श घातला आहे.

अखिल महाराष्ट्र खाटीक समाजाचे अध्यक्ष युसुफ ए. लतीफ अध्यक्षस्थानी होते. वाहेद खाटीक यांनी कुराण पठण करून सोहळ्याची सुरूवात झाली. या सामूहिक विवाह सोहळ्यास महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश येथून सुमारे ११ ते १२ हजार समाजबांधव उपस्थित होते. या उपक्रमामुळे गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांची वेळ व खर्चाची मोठी बचत झाली. या कार्यक्रमास अखिल महाराष्ट्र खाटीक समाजाचे माजी अध्यक्ष एल. ए. शेख, हुस्नोद्दीन, इब्राहिम सेठ, जिल्हाध्यक्ष अनवर खाटीक, गुजरात अध्यक्ष फिरोज खाटीक, फौजी शकील, मध्य प्रदेश अध्यक्ष वाहेद खाटीक, कासिम पहलवान, रईस सलीम, अकील खान (दोंडाईचा), अरमान यांच्यासह अनेक पदाधिकारी, जिल्हा व तालुकाध्यक्ष तसेच समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, जळगावचे मुफ्ती हारून करीम सालार, एजाज गफ्फार मलिक, पोलीस निरीक्षक दत्तात्रेय निकम, पालिकेचे अधिकारी उपस्थित राहून नवदाम्पत्यांना आशीर्वाद दिले. जिल्हा सचिव हाजी शरीफ व महाराष्ट्र उपाध्यक्ष कैसर खाटीक यांनी सूत्रसंचालन केले. जाकीर खाटीक व इमरान खाटीक यांनी आभार मानले. खाटीक समाजाचे अध्यक्ष मुख्तार खाटीक, उपाध्यक्ष जाकीर खाटीक अब्दुल्ला, सचिव जाकीर गनी, खजिनदार इमरान यांच्यासह संपूर्ण आयोजन समितीने सहकार्य केले.





अमळनेर : खाटीक समाजाच्या सामूहिक विवाह सोहळ्याप्रसंगी अखिल महाराष्ट्र खाटीक समाजाचे अध्यक्ष युसुफ ए. लतिफ, पोलीस निरीक्षक दत्तात्रेय निकम, प्रा. अशोक पवार व मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित खाटीक समाजबांधव.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com





# स्मृती मंधानाच्या तडाख्यामुळे आरसीबी चॅम्पियन!

## दिल्लीची सलग चौथ्यांदा निराशा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

स्मृती मंधाना आणि जॉर्जिया वॉल यांच्या तडाखेबंद बॅटिंगच्या जोरावर महिला प्रीमियर लीग फायलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने दिल्ली कॅपिटल्सचा ६ विकेट्सने पराभव केला. दिल्लीने दिलेले २०४ रन्सचे खडतर आव्हान आरसीबीने विकेट्सच्या मोबदल्यात पूर्ण केले.

### स्मृतीचा तडाखा

आरसीबीला २०४ रनचे लक्ष्य गाठून विजेतपद मिळविण्यासाठी कॅप्टन स्मृती मंधानावर मोठी अपेक्षा होती. स्मृतीने ही अपेक्षा पूर्ण केली. तिने फक्त २३ बॉलमध्ये ५ फोर आणि ३ सिक्सच्या मदतीने हाफ सेंच्युरी पूर्ण केली. हाफ सेंच्युरीनंतरही स्मृतीचा तडाखा कायम होता. तिने जॉर्जिया वॉलसोबत कोणताही धोका न पत्कारता दिल्लीच्या बॉलर्सना वरचढ होण्याची संधी दिली नाही.

जॉर्जिया वॉल ७९ रन काढून आऊट झाली. जॉर्जियाने ५४ बॉलमध्ये १४ फोरसह ७९ रन काढले. तर स्मृती मंधनाने ८७ रन काढले. आरसीबीने महिला प्रीमियर लीगचे दुसऱ्यांदा विजेतपद पटकावले आहे. यापूर्वी आरसीबीने २०२४ साली विजेतपद पटकावले होते. तर दिल्ली कॅपिटल्स मात्र सलग चौथ्यांदा फायनलमध्ये पोहोचून दुर्दैवी ठरली आहे.

### कशी झाली दिल्लीची बॅटिंग?

या मॅचमध्ये पहिल्यांदा बॅटिंग करताना दिल्ली कॅपिटल्सनं निर्धारित २० ओव्हर्समध्ये ४ आऊट २०३ रन केले होते. दिल्लीची कॅप्टन जेमिमा रॉड्रिग्सने जबरदस्त बॅटिंग करत टीमला २०० चा टप्पा ओलांडून दिला. जेमिमाने फायनलच्या सामन्यात कॅप्टनला साजेशी खेळी केली आणि अवघ्या ३२ बॉलमध्ये तिने हाफ सेंच्युरी ठोकली. या आधी झालेल्या एलिमिनेटर सामन्यातही जेमिमाने कमाल बॅटिंग केली होती आणि आपल्या टीमला फायनलमध्ये पोहोचवले होते. जेमिमा रॉड्रिग्स या सामन्यात नंबर ४ वर बॅटिंग करण्यासाठी उतरली होती. जेव्हा ती मैदानात आली तेव्हा दिल्लीने लिजेल लीची महत्त्वाची विकेट गमावली होती. ली ३० बॉलमध्ये ३७ रन करून आऊट झाली. त्यानंतर जेमिमाने धडाकेबाज बॅटिंग करत ३२ बॉलमध्ये आपली हाफ सेंच्युरी पूर्ण केली. तिने या सामन्यात एकूण ३७ बॉलमध्ये ५७ रनची खेळी केली. ज्यामध्ये तिने ८ फोर मारले. जेमिमा जेव्हा बॅटिंगला आली तेव्हा तिच्या टीमला आधीच चांगली सुरूवात मिळाली होती. दिल्लीने ७.३ ओव्हरमध्ये ७२ रन केले होते. तिने हीच लय पुढे नेली. दिल्लीसाठी जेमिमाशिवाय शेवटच्या ओव्हरमध्ये चिनेल हेन्रीने तुफानी बॅटिंग केली. हेन्रीने १५ बॉलमध्ये नाबाद ३५ रन बनवले. ज्यामुळे दिल्लीने २०० रनचा आकडा पार केला. तिने या खेळीत ४ फोर आणि २ सिक्स मारले.

# पांच बार फेल होकर भी नहीं हारी हिम्मत, छठवीं बार में लेफ्टिनेंट बन रचा इतिहास

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कुछ कर गुजरने का जुनून जब सवार हो जाता है तो असफलताएं ताकत देने का काम करती हैं। यह कथन राजस्थान के खाटू श्याम गांव की रहने वाली लेफ्टिनेंट चेतना शर्मा पर बिलकुल सटीक बैठता है। चेतना शर्मा एयर डिफेंस रेजिमेंट में तैनात हैं। ये रेजिमेंट ड्रोन और एयरक्राफ्ट के जरिए भारतीय एयर स्पेस की रक्षा करती है। ५ बार सीडीएस परीक्षा में फेल होकर भी चेतना ने अपने बचपन के सपने को पूरा किया।

### लेफ्टिनेंट चेतना शर्मा


कुछ कर गुजरने का जुनून जब सवार हो जाता है तो असफलताएं ताकत देने का काम करती हैं। यह कथन राजस्थान के खाटू श्याम गांव की रहने वाली लेफ्टिनेंट चेतना शर्मा पर बिलकुल सटीक बैठता है।

### चेतना शर्मा एयर डिफेंस रेजिमेंट में तैनात

चेतना शर्मा एयर डिफेंस रेजिमेंट में तैनात हैं। ये रेजिमेंट ड्रोन और एयरक्राफ्ट के जरिए भारतीय एयर स्पेस की रक्षा करती है। ५ बार सीडीएस परीक्षा में फेल होकर भी चेतना ने अपने बचपन के सपने को पूरा किया।

### साल २०२३ में गणतंत्र दिवस परेड में शामिल

चेतना शर्मा ने साल २०२३ के गणतंत्र दिवस समारोह में महिला सशक्तिकरण की अनूठी मिसाल पेश की थी। उन्होंने मिसाइल टुकड़ी का नेतृत्व किया था।




### एनआईटी भोपाल से ग्रेजुएशन

लेफ्टिनेंट चेतना ने मध्यप्रदेश की राजधानी भोपाल के NIT से ग्रेजुएशन किया है। इसके बाद उन्होंने सीडीएस की परीक्षा दी थी। वह पांच बार सीडीएस की परीक्षा में असफल हुई थीं।

### ५ बार फेल होकर भी नहीं टूटा हौसला

बकौल चेतना शर्मा वह हर बार किसी न किसी कारण से परीक्षा पास नहीं कर पाती थी लेकिन, उन्होंने कभी हार नहीं मानी। उन्होंने कड़ी मेहनत जारी रखी और छठी बार उन्होंने परीक्षा में अपना परचम फहराया।

### छठवें प्रयास में सफलता


उनकी सफलता की कहानी उन लोगों के लिए प्रेरणादायक है जो असफल होकर हार मान लेते हैं। अपने छठे अटेंप्ट में उन्होंने ये परीक्षा पास की थी।

### बचपन का सपना किया पूरा

लेफ्टिनेंट चेतना का कहना है कि वह बचपन से ही टीवी में हर साल गणतंत्र दिवस की परेड देखती थी और इसमें शामिल होने का सपना देखती थीं।

# ‘करिअरच्या ६३ व्या वर्षी लोकांना मी इतका महत्वाचा वाटत असेल तर...’

## ट्रोलर्सना सचिन पिळगांवकर यांचे सडेतोड उत्तर



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सचिन पिळगांवकर मराठी कलाविश्वातील सुप्रसिद्ध अभिनेते आहेत. वयाच्या ६८ व्या वर्षीही सचिन इंडस्ट्रीमध्ये सक्रीय आहेत. सचिन पिळगांवकर यांना वयाच्या ५ व्या वर्षी राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला. तेव्हापासून सचिन यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. त्यांनी मराठीसोबतच हिंदी सिनेमांमध्येही मुख्य भूमिका साकारल्या. सचिन अनेक मुलाखतींमध्ये त्यांचे काही किस्से, अनुभव शेअर करतात. मात्र, कायम त्यांना ट्रोल करण्यात येते. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सचिन पिळगांवकर यांनी ट्रोलिंगवर भाष्य केले आहे.

### ट्रोलिंगवर काय म्हणाले सचिन पिळगांवकर?

सचिन पिळगांवकर सध्या ‘मी होणार सुपरस्टार छोटे उस्ताद’ या कार्यक्रमाचे परीक्षण करत आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सचिन आणि वैशाली सामंत यांनी मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान सचिन यांना ट्रोलिंगबद्दल विचारण्यात आले. त्यावर सचिन पिळगांवकर म्हणाले, की ‘ट्रोलिंग झाले तरीसुद्धा प्रेम करणाऱ्यांची संख्या खूप जास्त आहे. काळजी करण्याचे काम कधी होईल, जेव्हा ती संख्या कमी होईल. शाहरुखला कोणीतरी विचारले, की ‘ट्रोलिंगमुळे तुला त्रास नाही होत?’ त्यावर तो म्हणाला, की ‘एक माणूस ज्याने आयुष्यात कधीच काहीच नाही केले, तो माणूस जर असे ट्रोल करून रात्री शांत झोपत असेल. तर त्याच्या झोपेचे कारण मी आहे. त्यामुळे मी आनंदी आहे.’

### सोशल मीडियामुळे अनेक जाहिराती मिळाल्या


‘माझ्यासारख्या माणसाची ३१ डिसेंबरला करिअरची ६२ वर्षे पूर्ण होणार आहेत आणि ६३ वर्षे जानेवारीपासून सुरू होणार आहे. तर करिअरच्या ६३ व्या वर्षी या लोकांना मी इतका महत्त्वाचा वाटत असेल, तर याच्याहून जास्त मला काय पाहिजे. सोशल मीडियावर आता मी इतका प्रसिद्ध आहे, की त्यामुळे मला आता खूप जाहिराती मिळतायत. तर ठीके ना! हा पण बदल आहे. हे काम करणारी मुले आहेत. ती मुले असल्यामुळे त्यांना मी भरभरून आशीर्वाद देतो. त्यांचे नाव व्हावे, असा माझा त्यांना आशीर्वाद आहे,’ असे सचिन यांनी सांगितले.

वैशाली सामंत म्हणाली, की ‘मला असे वाटायचे की कलाकार किती मेहनतीने आपले करिअर घडवतो. त्याच्याविरुद्ध तुम्ही बोलायचे. मला वाईट तेव्हा वाटते माझ्या मेहनतीवर कोणी काही बोलले की मला त्रास होतो.’

# झोप कमी, आजार जास्त, कोणत्या वयात किती झोप गरजेची?

## जाणून घ्या स्लीप चार्टमधून...

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



नॅशनल स्लीप फाउंडेशनच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की, झोपेच्या वेळी आपला मेंदू स्वतःला विषाक्त घटकांपासून शुद्ध करतो. तरूण असाल आणि सहा तासांपेक्षा कमी झोपलात तर तुम्हाला ताण, लठ्ठपणा आणि हृदयरोगाचा धोका ४० टक्के वाढू शकतो. झोप ही आपल्या शरीराला आणि मनाला ताजेतवाने करण्याचा एक नैसर्गिक मार्ग आहे. दिवसभराच्या थकव्यानंतर रात्री सात ते आठ तासांची झोप आपल्या मेंदूला रिस्टार्ट करते. झोपेच्या वेळी आपले शरीर स्वतःला दुरूस्त करते आणि आपला मेंदू रिचार्ज होतो.

### झोप का महत्त्वाची आहे?

मजबूत रोगप्रतिकारक शक्तीसाठी झोप अत्यंत महत्त्वाची आहे. कारण ती शरीराला संसर्ग आणि जळजळ यांच्याशी लढणाऱ्या संरक्षणात्मक सायटोकिन्स, अँटीबॉडीज आणि टी–पेशी तयार करण्यास मदत करते. दीर्घकाळ झोपेचा अभाव विषाणूंकडे संवेदनशीलता वाढवतो आणि शरीराला रोगाचा धोका वाढवतो. झोपेच्या कमतरतेमुळे शरीरात जळजळ देखील होते. झोप ही शरीराची दुरूस्ती करण्याची पद्धत आहे. या काळात मेंदू पूर्णपणे बंद होत नाही. त्याऐवजी तो दिवसभराची माहिती प्रक्रिया करतो, महत्त्वाच्या आठवणी साठवतो आणि अनावश्यक माहिती काढून टाकतो. रात्रीच्या चांगल्या झोपेनंतर मेंदू अधिक तीक्ष्ण, शांत आणि अधिक लक्ष केंद्रित करण्यास सक्षम होतो.

### अनेकांना सतावतात झोपेच्या समस्या

२०२६ मध्ये ३ पैकी १ प्रौढ व्यक्ती ७ ते ९ तास पुरेशी झोप घेऊ शकणार नाही. डिजिटल ओव्हरलोड आणि मोबाईल फोनच्या अनियंत्रित वापरामुळे २०२६ मध्ये निद्रानाशाच्या प्रकरणांमध्ये ४७ टक्के वाढ झाली आहे. २०२६ मध्ये झोपेचा अभाव हे केवळ थकव्याचे कारण नाही तर जागतिक आरोग्य आणीबाणी म्हणून समोर येत आहे. २०२६च्या अलिकडच्याच संशोधनात आणि डेटानुसार, आपली वाईट जीवनशैली आपल्याला रात्रीची झोप हिरावून घेत आहे. जानेवारी २०२६ मध्ये भोपाळमधील एम्सच्या एका नवीन संशोधनानुसार, झोपेचा अभाव आणि कॅन्सर यांच्यात परस्परसंबंध आढळून आला आहे. पुरेशी झोप न मिळाल्याने शरीराची प्रतिकारशक्ती कमकुवत होते. त्यामुळे शरीर कॅन्सरच्या पेशी आणि संसर्गांशी लढण्यास अपयशी ठरते.

### अपुऱ्या झोपेचे आरोग्यावर होणारे परिणाम

भारतात ७० टक्के लोक दिवसातून ६ तासांपेक्षा कमी झोपतात आणि ३० टक्के लोक झोपेची गुणवत्ता खराब असल्याचे सांगतात. दिवसातून ६ तासांपेक्षा कमी झोप घेतल्याने केवळ थकवाच नाही तर लठ्ठपणा, ताण आणि हृदयरोग देखील होऊ शकतो.

गेल्या १५ वर्षांपासून डॉक्टर म्हणून काम करणारे आयुर्वेदिक आणि युनानी औषधांचे तज्ज्ञ डॉ. सलीम झैदी यांनी दि इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले की, लॉकडाऊनपासून झोपेचा अभाव २५ टक्क्यांनी वाढला आहे. अनिद्रा, कमी झोपेची स्थिती, आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम करते. झोपेच्या कमतरतेमुळे दिवसा थकवा येतो, शारीरिक क्षमता कमी होते आणि शरीराचे कार्य बिघडते. जर निद्रानाशाकडे दीर्घकाळ दुर्लक्ष केले तर डायबिटीज, हाय ब्लड प्रेशर, लठ्ठपणा आणि हृदयरोगाचा धोका वाढतो.

तुम्ही किती वेळ झोपता? झोपेचा अभाव तुमच्या मूड आणि ऊर्जेवर परिणाम करतो हे तुमच्या लक्षात येते का? वयानुसार निरोगी राहण्यासाठी तुम्हाला किती झोपेची आवश्यकता याबाबतचा हा चार्ट पहा.

वयानुसार किती झोप गरजेची असते?

### वयनिहाय रोज किती झोप गरजेची?

०  ते ३ वर्ष– १४ ते १७ तास
४ ते १२ वर्षे– ९ ते १२ तास
१३ ते १८ वर्षे– ८ ते १० तास
१८ ते ६४ वर्षे– ७ ते ९ तास
६५ वर्षांपेक्षा जास्त– ७ ते ८ तास

### झोप कशी सुधारायची?

दररोज ७ ते ८ तास झोपा. झोपण्यापूर्वी मोबाईल आणि स्क्रीन टाइम कमी करा. हलका व्यायाम आणि योगा करा

कॅफिन आणि अल्कोहोलपासून दूर राहा. झोप ही फक्त विश्रांती नाही. चांगली झोप घेतल्याने तुमचे मन तीक्ष्ण होते, तुमचा मूड सुधारतो, तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि तुमचे शरीर एकूणच निरोगी राहते.

# निसर्गाचा अद्‌भुत चमत्कार अंधारातही वटवाघळे कसा मार्ग शोधतात?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

रात्रीच्या काळोखातही वटवाघळे अतिशय वेगाने आणि अचूकपणे आपली शिकार कशी शोधतात? जाणून घेऊया त्यांच्या प्रवासाचे विज्ञान.

वटवाघळे प्रामुख्याने ‘इकोलोकेशन’ तंत्राचा वापर करतात. ते हवेत उच्च– फ्रिक्वेन्सीचे अल्ट्रासोनिक आवाज सोडतात. ते मानवी कानांना ऐकू येत नाहीत. हे आवाज वस्तूंवर आदळून परत येतात. ज्याचा अर्थ लावून वटवाघळे मनात सभोवतालचा ‘ध्वनिक नकाशा’ तयार करतात आणि शिकार शोधतात.

संशोधनानुसार, ही वटवाघळे अनेक प्रतिध्वनींमधून ‘डॉपलर शिफ्ट’ ध्वनी किंवा प्रकाशाच्या लहरींच्या वारंवारतेमध्ये होणारा बदल दर्शवणारी एक वैज्ञानिक संकल्पना वाचून आपला अचूक मार्ग ठरवू शकतात.

वटवाघळे त्यांच्या स्वरयंत्रातून काढत असलेल्या आवाजाची तीव्रता ही जवळून जाणाऱ्या जेट इंजिनपेक्षाही जास्त असू शकते. दाट झाडीत किंवा गोंधळलेल्या वातावरणात वैयक्तिक प्रतिध्वनींवर अवलंबून न राहता, ते हलत्या ध्वनीलहरींच्या आधारे आपला वेग कमी– जास्त करतात. वटवाघळाचे विशेष आकाराचे मोठे कान केवळ प्रतिध्वनी पकडण्यासाठी बनले आहेत, जे शत्रू किंवा अन्नाचा मागोवा घेण्यास मदत करतात. सर्वच वटवाघळे आंधळी नसतात. फळ खाणारी वटवाघळे आपली तीक्ष्ण दृष्टी आणि जिभेच्या साहाय्याने निघणाऱ्या ‘क्लिक’ आवाजाचा वापर करून मार्ग शोधतात.

शांत – चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# नवग्रहांची ‘कुंडली’ कथा : ‘न्यायाधीश’ शनी

## माणसाच्या मनाची शुद्धी, अहंकाराचा नाश करणारा ग्रह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नवग्रहातील अत्याधिक आणि विशेष महत्त्वाचा मानला गेलेला ग्रह म्हणजे शनी. पुराणात शनीबाबत अनेक मान्यता, कथा प्रचलित आहेत. काही मान्यतांनुसार प्रभू श्रीरामचंद्रांना शनीमुळे वनवासाला जावे लागले. महाभारत काळात पांडवांना वनवास आणि अज्ञातवास भोगावा लागला. राजा विक्रमादित्यांना समस्यांचा सामना करावा लागला. राजा हरिश्चंद्रांना मोठ्या अडचणीतून जावे लागले. शनी हा सूर्यपुत्र असल्याचे सांगितले जाते. याबाबत काही कथाही पुराणात सांगितल्या जातात. शनी वडिलांचे विद्रोही, महादेव शिवशंकरांचे परमभक्त व माता प्रिय असल्याचे म्हटले जाते. भगवान शंकर यांनी शनीला नवग्रहांचा न्यायाधीश केले, असेही सांगितले जाते. जोपर्यंत शनीला लंकापती रावणाने उलटे पाडून आपल्या पायाखाली ठेवले होते, तोपर्यंत रावणाला साडेसातीची भीती नव्हती. हनुमानजींनी लंकादहनावेळी शनीला मुक्त केले. शनीची दृष्टी रावणार पडली आणि रावणाची दुर्दशा सुरू झाली, अशी एक कथा सांगितली जाते.

शनी हा सूर्यमालेतील सहावा ग्रह आहे. शनीला स्वतःभोवती प्रदक्षिणी घालण्यास १० तास १४ मिनिटे लागतात. शनीला सूर्याभोवती प्रदक्षिणा करण्यास ३० वर्षे लागतात. म्हणजेच शनी एका राशीत सुमारे अडीच वर्षे म्हणजे ३० महिने वास्तव्य करतो. शनी हा रविपुत्र व यमाचा मोठा भाऊ आहे. शनीला गतीमुळे मंद हे नाव प्राप्त झाले आहे. याशिवाय शनैश्वर, अर्की, सौर्य, कौण, रविपुत्र, अशी काही नावे शनीची आहेत. अरबी भाषेत त्याला जुहल व इंग्रजीत सॅटर्न म्हणतात.

### पाप, क्रूर दैन्यकारक ग्रह शनी आणि साडेसाती

शनी हा दुःख, दैन्य कारक ग्रह मानला जातो. काळ्या रंगावर अंमल असून, शनी हा सेवक आहे. शनी हा पश्चिम दिशेचा स्वामी असून, पाप, क्रूर ग्रह आहे. पापग्रहामध्ये शनी हा अग्रगण्य आहे. मकर व कुंभ या दोन राशींचा अधिपती शनी आहे. नीलम हे शनीचे रत्न असून, ब्रह्मा ही याची देवता आहे. शनीची उपास्यदेवता हनुमानजी आहेत. पुष्य, अनुराधा व उत्तराभाद्रपदा या तीन नक्षत्रांचे स्वामीत्व शनीकडे आहे. अंकशास्त्राप्रमाणे ८ या मूलांकाचे स्वामीत्व शनीकडे आहे. हस्तसामुद्रिकशास्त्राप्रमाणे मधले बोट व त्याखालील उंचवटा यावर शनीचे स्थान मानलेले आहे. आठवड्यातील शनिवार या दिवसावर शनीला अंमल आहे. तूळ ही शनीची उच्च रास असून, मेष ही नीचेची रास आहे. शनी साडेसाती तर सर्वांनाच परिचित आहे. साडेसातीयोग हा शनीचा विशेष अधिकार आहे.



### शनी हा ग्रह गुरूला आध्यात्मिक गुरू मानतो

शनी हा जात्याच भित्रा व लाजाळू आहे. समाजापासून दूर राहणारा, विचारवंत, हट्टी दुराग्रही, खिन्न व निराश प्रवृत्तीचा आहे. धूर्त व फसवेगिरी करणारा आहे. स्वार्थाला जपणारा आहे. भारतीय आचार्यांनी शनीला तूळ, मकर, कुंभ व मीन राशी अत्यंत शुभ मानल्या आहेत. शनी हा माणसाचे मन स्वच्छ व शुद्ध करणारा, मनातील घाण व कुविचार टाकून उच्चप्रतीला नेणारा हा एकच ग्रह आहे. शिस्तीचा पाईक आहे. जीवनाचे मर्म जाणणारा व कटू सत्य उघड करून सांगणारा आहे. जे याची अवज्ञा करतात त्यांना तो खाली ओढतो व माणसाच्या अंहकाराचा नाश करतो. जे शिस्तबद्ध, विनयशील, नम्र आहेत. त्यांना उच्च शिखरावर नेऊन बसवतो, अशी शनीची ख्याती सांगितली जाते. शनी हा गुरू ग्रहाला आध्यात्मिक गुरू मानतो. म्हणून गुरूच्या दृष्टीने व गुरुग्रही त्याची फळे सुधारतात. शनी व गुरूची व्ययस्थानावर संयुक्त दृष्टी संन्यास व मोक्षप्राप्तीस शुभ असते. उदा.- आद्यशंकराचार्य. बुध, शुक्र, राहू हे शनीचे मित्र ग्रह आहेत. तर चंद्र, रवी व मंगळ शत्रू आहेत. गुरूशी तो समत्वाने वागतो. याचा स्वभाव अत्यंत तीक्ष्ण असून हा ३६ ते ४२ या वर्षाच्या कालावधीत जातकाचा भाग्योदय करतो, असे सांगितले जाते.

# उत्तर दिशेतील आरसा व कुबेर तत्त्व सक्रियता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरातील एक साधा आरसा केवळ सौंदर्यासाठी नसून, योग्य दिशेत ठेवला तर तो नोकरी, उत्पन्न, संधी आणि प्रगती यांचे मार्ग उघडू शकतो. वास्तुशास्त्रात उत्तर दिशा ही कुबेराची दिशा मानली गेली आहे. या दिशेत योग्य उपाय केल्यास थांबलेली गती पुन्हा सुरू होते.

### उत्तर दिशा : अर्थ व महत्त्व

उत्तर दिशा ही धनप्रवाहाची दिशा. करिअर व संधींचे केंद्र. वाढ, विस्तार व नेटवर्किंग यांची दिशा आहे. या दिशेत ऊर्जा वाढवणारा घटक जोडला तर त्याचा परिणाम दुप्पट होतो.

### आरसा : ऊर्जा प्रतिबिंबाचे साधन

आरसा म्हणजे केवळ प्रतिबिंब नव्हे तर ऊर्जा वाढवणारे माध्यम. संधी आकर्षित करणारे साधन. आत्मप्रतिमेला बळ देणारा घटक. उत्तर दिशेत आरसा ठेवला तर तो कुबेर तत्त्वाला सक्रिय करतो.

### शास्त्रोक्त उपाय

घराच्या उत्तर दिशेच्या भिंतीवर मोठा आरसा लावावा. ज्यामध्ये पूर्ण शरीर स्पष्ट दिसेल. आरसा स्वच्छ, चमकदार व अखंड असावा. शक्य असल्यास आरसा असा असावा की त्यात स्वच्छ जागा, प्रकाश किंवा समृद्धीची वस्तू दिसेल.

### हा उपाय प्रभावी का ठरतो?

उत्तर दिशा ऊर्जा वाढवते. आरसा त्या ऊर्जेचे प्रतिबिंब व विस्तार करतो. कुबेर तत्त्व सक्रिय होऊन अडथळे दूर करते. व्यक्तीच्या मनोधारणेत सकारात्मक बदल होतो.

### अपेक्षित सकारात्मक परिणाम

संधी अचानक निर्माण होतात. प्रमोशन/नवीन उत्पन्न स्रोत दिसू लागतात. आत्मविश्वास व निर्णयक्षमता वाढते.

### अतिरिक्त पूरक मुद्दे

उत्तर दिशेत अधिक प्रकाश ठेवा. आरशाजवळ हिरवी वनस्पती असल्यास लाभ वाढतो. आरशात तिजोरी, कॅश बॉक्स किंवा समृद्ध प्रतिमा प्रतिबिंबित झाल्यास परिणाम जलद दिसतो. रोज सकाळी आरशात पाहताना कृतज्ञता भाव ठेवा.

### सावधानता व निषेध

तुटलेला, धूसर किंवा डागाळलेला आरसा वापरू नये. आरशात कचरा, बाथरूम, जिना दिसू नये. हा उपाय दक्षिण किंवा पश्चिम दिशेत करू नये. उत्तर दिशेतील आरसा हा केवळ वस्तू नसून, तो संधींचा द्वारपाल ठरतो.

# शनिवारी चुकूनही ‘या’ वस्तू खरेदी करू नका




### शनिदेव होतील नाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रात शनी देवांना महत्त्वाचे स्थान आहे. शनी देवांना कर्मफळदाता म्हणतात. ज्योतिषशास्त्रानुसार शनी देवांना नाराज करणे म्हणजे स्वःवर संकट ओढवून घेण्यासारखे आहे. शनी देवांची कृपादृष्टी आपल्यावर राहावी म्हणून आपण वेगवेगळे उपाय करत असतो. कोण तेल अर्पण करते, तर कोण तीळ अर्पण करते. पण सोबतच शनी देव चुकूनही आपल्यापासून नाराज व्हायला नको याचीही काळजी घेणे तेवढेच महत्त्वाचे आहे. कारण जर शनी देवांनी आपल्यावर वक्रदृष्टी टाकली तर राजापासून रंक बनू शकता.

काही वेळा नकळत आपल्याकडून काही गोष्टी घडतात, ज्यामुळे शनी देव आपल्यावर नाराज होतात. ज्योतिषशास्त्रानुसार शनिवार हा वार शनी देवांना समर्पित आहे. त्यामुळे शनिवारच्या दिवशी काही गोष्टी विकत घेणे दुर्दैवाकडे नेण्यासाठी कारणीभूत ठरतील. यासाठी शनिवारी कोणत्या वस्तूंची खरेदी करू नये हे जाणून घेऊया.

**लोखंडाच्या वस्तू**



शनिवारी लोखंडाच्या वस्तू खरेदी केल्यास किंवा त्या घरी आणल्यास शनी देव नाराज होऊ शकतात. याउलट लोखंडाच्या वस्तू दान कराव्यात.

**मीठ**



शनिवारच्या दिवशी मीठ खरेदी केल्यास कर्जाचं डोंगर वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे शनिवारी चुकूनही मीठ खरेदी करणे टाळा.

**काळे तीळ**



शनी देवांना काळे तीळ अर्पण करतात. त्यामुळे शनिवारी काळे तीळ विकत घेतल्याने शनी देव नाराज होतात. याउलट काळे तीळ दान करावेत.

**काळ्या रंगाच्या चपला**



शनिवारी काळ्या रंगाच्या चपला खरेदी करणे म्हणजे अपयशाला ओढवून घेणे. ज्योतिषशास्त्रानुसार शनिवारी काळ्या चपला खरेदी करणाऱ्या व्यक्तीला यश मिळविण्यात अडथळे येतात.

# शनी ग्रह शांतीसाठी कोणते आहेत वैदिक उपाय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैदिक ज्योतिषशास्त्रात शनी हा महान कर्मकारक ग्रह आहे. न्याय, शिस्त आणि चिकाटीचा ग्रह. योग्य स्थितीत असलेला शनी प्रचंड स्थिरता आणि यश देतो. परंतु पीडित शनी विलंब, अडथळे आणि अडचणी आणू शकतो. या मार्गदर्शकामध्ये पीडित शनीला शांत करण्यासाठी आणि त्याच्या प्रगल्भ उर्जेशी जुळवून घेण्यासाठी पारंपरिक उपायांचे स्पष्टीकरण दिले आहे.

### शनीसाठी उपाय कधी आवश्यक आहे?

जर तुमच्या जन्मकुंडलीत शनी ग्रह दुःखी असेल किंवा त्याच्या कठीण संक्रमणादरम्यान असेल तर तुम्हाला त्याच्यासाठी उपाय करावे लागू शकतात. सामान्य संकेतांमध्ये हे समाविष्ट आहे.

- सर्व प्रयत्नांमध्ये सतत विलंब, निराशा आणि अडथळे अनुभवणे.
- करिअरमधील संघर्ष, व्यवसायातील तोटा किंवा दीर्घकालीन आर्थिक समस्या.
- दीर्घकालीन आरोग्य समस्यांनी ग्रस्त, विशेषतः हाडे, दात किंवा मज्जासंस्थेशी संबंधित.
- निराशावाद, भीती आणि नैराश्याकडे कल.

सध्या साडेसाती, अष्टम शनी (आठव्या घरात संक्रमण) किंवा अर्धाष्टम शनी (चौथ्या घरात संक्रमण) सारखे शनीचे प्रमुख संक्रमण आहे.

विशिष्ट चार्ट प्लेसमेंट जसे की दुर्बल (नीच) शनी किंवा इतर अशुभ ग्रहांशी शनी युती.

### शनी ग्रहासाठी उपायांचे प्रकार

वैदिक परंपरेत शनीची ऊर्जा एकत्रित करण्याचे अनेक मार्ग आहेत. शनी ग्रह शांतीच्या प्राथमिक पद्धती म्हणजे मंत्र, यज्ञ आणि दान.

### १) शनी मंत्र जप

मंत्रांचा जप हा ग्रहदेवतेशी संबंध जोडण्याचा एक शक्तिशाली मार्ग आहे. शनी ग्रहासाठी मंत्रांच्या पुनरावृत्तीची एकूण संख्या साधारणपणे १९ हजार असते. त्यासाठी सामान्य मंत्र आहेत.

**पुराणोक्त मंत्र**

**नीलांजना समभासम् रवि पुत्रम् यमग्रजम्**
**छाया मार्तंड सम्भूतम् तम नमामि शनैश्चरम्”**

**बीज मंत्र**

**‘ओम प्रीम प्रम सह शनैश्चराय नमः’**

योग्य उच्चारण आणि संकल्पासाठी एखाद्या पात्र गुरू किंवा पंडिताकडून शिकणे चांगले.

### २) शनी ग्रह शांती यज्ञ किंवा होम

यज्ञ किंवा होम हा गंभीरपणे पीडित ग्रहासाठी सर्वांत पूर्ण आणि दीर्घकाळ टिकणारा उपाय आहे. हा एक पवित्र अग्नी विधी आहे जो विद्वान पुजारी देवतेचे आशीर्वाद घेण्यासाठी करतात. शनी यज्ञ म्हणजे विशिष्ट मंत्रांचा जप करताना पवित्र पदार्थ (तीळासारखे) अग्नीला अर्पण करणे. ज्यामुळे शनीशी संबंधित नकारात्मक कर्म शुद्ध होतात.

### ३) इतर सोपे उपाय

**हनुमानाची पूजा करा :** हा सर्वांत प्रभावी उपायांपैकी एक मानला जातो. शनिवारी हनुमान चालीसा पठण केल्याने शक्तिशाली संरक्षण मिळते.

**उपवास :** शनिवारी उपवास करावा. जर आरोग्य अनुकूल असेल तर सूर्यास्तानंतर साधे अन्न घ्यावे.

**दान (दाना) :** शनिवारी काळे तीळ, उडीदडाळ, मोहरीचे तेल किंवा ब्लँकेट यासारख्या काळ्या वस्तू गरीब आणि गरजूंना दान कराव्यात.

**निळा नीलम (नीलम) घाला :** हा शनीचा मुख्य रत्न आहे. हा एक अत्यंत शक्तिशाली आणि जलद गतीने काम करणारा रत्न आहे जो तज्ज्ञ ज्योतिषींशी सविस्तर सल्लामसलत केल्यानंतरच घाला पाहिजे. कारण तो योग्य नसल्यास हानिकारक ठरू शकतो.

**सेवा (सेवा) :** शनी हा सेवेचा ग्रह आहे. वृद्ध, कामगार किंवा अपंगांना निःस्वार्थपणे मदत करणे हा शनीची कृपा मिळविण्याचा एक शक्तिशाली मार्ग आहे.

# भारतातील ७ सर्वांत प्रतिष्ठित, शक्तिशाली हनुमानजींची मंदिरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान हनुमानजी जे एक भक्त आणि देव आहेत. जगभरातील अनेक हिंदू त्यांच्यावर प्रेम करतात, त्यांचा आदर करतात आणि त्यांच्याकडे पाहतात. लोक प्रेरणा, शक्ती, दृढनिश्चय आणि इतर गोष्टींसाठी भगवान हनुमानजींकडे पाहतात. त्यांच्या विविध रूपांमध्ये भगवान हनुमानजी नेहमीच त्यांच्या भक्तांसाठी असतात, त्यांची सुरक्षा सुनिश्चित करतात. भगवान हनुमानजी हे एक धन्य अमर देखील आहेत जे पृथ्वीच्या जवळ राहतात. जेणेकरून ते त्यांच्या भक्तांना मदत करू शकतील आणि भगवान प्रभू श्रीरामचंद्रांचे नाव घेणाऱ्या लोकांसोबत बसू शकतील.

### भारतात हनुमानजींची ७ सर्वांत शक्तिशाली मंदिरे कुठे आहेत?

**प्राचीन हनुमान मंदिर, दिल्ली :**



भारतातील भगवान हनुमानजींच्या सर्वांत प्रसिद्ध मंदिरांपैकी एक म्हणजे कॅनॉट प्लेस दिल्ली येथील प्राचीन हनुमानजी मंदिर. हे सर्वांत जुन्या हनुमानजी मंदिरांपैकी एक आहे आणि दर मंगळवार आणि शनिवारी येथे भाविक येतात. या मंदिराजवळील ऊर्जा अत्यंत शुद्ध, मजबूत आणि पवित्र आहे. कारण सायंकाळची आरती वातावरण प्रेम आणि भक्तीने भरून जाते आणि भगवान हनुमानजींची एक झलक लोकांना त्यांच्या भक्तीत रमून जाण्याची आणि त्यांच्या भक्तीत मग्न होण्याची इच्छा निर्माण करते.

**संकट मोचन हनुमान मंदिर, वाराणसी :**



प्रसिद्ध अस्सी घाटाजवळ असलेले संकटमोचन हनुमानजी मंदिर भक्तांच्या मार्गातील कोणत्याही आजार, भीती आणि अडथळ्यांना दूर करण्यासाठी प्रसिद्ध आहे. असे म्हटले जाते, की हे मंदिर घाटाच्या जवळ कवी-संत तुलसीदासजी यांनी स्थापन केले होते आणि त्यांना याच ठिकाणी भगवान हनुमानजी आणि भगवान श्रीरामचंद्र यांचे स्वप्न पडले होते. या मंदिरात अशा भक्तांची वारंवार भेट होते की ज्यांना त्यांच्या समस्यांचे निराकरण हवे असते किंवा त्यांच्या मार्गातील अडथळ्यांमुळे त्रास सहन करावा लागतो.

**जाखू मंदिर, शिमला :**



सर्वांत उंच हनुमान मंदिरांपैकी एक म्हणजे हिमाचलमधील शिमला येथील जाखू मंदिर. जेथे भाविक केबल कारने वर जातात. जाखू मंदिरात भगवान हनुमानजींची १०८ फूट उंच मूर्ती आहे जी शिमलातील जवळजवळ कुठूनही दिसते. आख्यायिकेनुसार लक्ष्मणासाठी संजीवनी औषधी वनस्पती घेण्यासाठी प्रवासादरम्यान भगवान हनुमानजी येथे विश्रांती घेण्यासाठी थांबले होते.

**पंचमुखी हनुमान मंदिर, रामेश्वरम :**



जेव्हा पाताळाचा राजा आणि रावणाचा भाऊ अहिरावण आणि भगवान हनुमानजी यांच्यात एक भयंकर युद्ध झाले. तेव्हा त्यांना सांगण्यात आले, की अहिरावणाचा पराभव करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे युद्धस्थळातील पाचही ज्वाला एकाच वेळी विझविणे. आणि हे असे आहे जेव्हा भगवान हनुमानी पंचमुखी (पाचमुखी रूप) अवतारात येऊन ज्वाला विझवून भगवान श्रीरामचंद्र आणि लक्ष्मण यांना वाचवतात. रामेश्वरममधील हे मंदिर असे मानले जाते, की जेथे भगवान हनुमानजींचे पंचमुखी रूप पुढे आले.

**मेहंदीपूर बालाजी मंदिर, राजस्थान :**



जगभरात प्रसिद्ध असलेले मेहंदीपूर बालाजी हे मंदिर ‘हिंदू भूतविद्या’ मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. हे भगवान हनुमानजींच्या सर्वांत शक्तिशाली मंदिरांपैकी एक आहे. कारण ते बालाजीच्या रूपात आपल्या भक्तांना वाईट आणि नकारात्मकतेच्या तावडीतून मुक्त करतात. असे मानले जाते, की या मंदिरात आणि आजूबाजूला उपचार आणि चमत्कारिक ऊर्जा आहेत.

**बेदी हनुमान मंदिर, ओडिशा :**



ओडिशामधील बेदी हनुमानजी मंदिर हे एक मंदिर आहे जेथे भगवान हनुमानजी ‘बेदिया’ म्हणजेच लोखंडी साखळ्या आणि तावडीत आहेत. हे मंदिर जगन्नाथ मंदिराजवळ आहे आणि त्याची एक अनोखी कथा आहे. आख्यायिकेनुसार पुरीमध्ये लाटांचा पूर येऊ नये म्हणून हे मंदिर बांधण्यात आले होते आणि भगवान हनुमानजी यांना हे काम सोपविण्यात आले होते. परंतु ते भगवान श्रीरामचंद्रांना भेटण्यासाठी किंवा अयोध्येला भेट देण्यासाठी उडून जात असत. त्यामुळे भगवान जगन्नाथांना त्यांना साखळ्यांनी बांधावे लागत असे. जेणेकरून ते लोकांचे रक्षण करू शकतील आणि त्यांचे कर्तव्य पार पाडू शकतील.



**सालासर हनुमान मंदिर, राजस्थान :**

सालासर येथील सालासर हनुमानजी मंदिर हे राजस्थानमधील भगवान हनुमानजींचे आणखी एक शक्तिशाली मंदिर आहे. हे मंदिर त्यांना समर्पित एक अद्वितीय मंदिर आहे कारण येथील भगवान हनुमानजींच्या प्रतिमेत मिशा आणि दाढी आहे, इतर मूर्ती किंवा प्रतिमांपेक्षा वेगळे. सालासर बालाजीमध्ये, भगवान हनुमानजींच्या चेहऱ्यावर खूप शांत, प्रसन्न भाव आहे आणि असे दिसते, की ते त्यांच्या भक्तांकडे पाहताना हसत आहेत.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)